

| वर्ष - 9 । अंक -17 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

www.mahaenews.com । बुधवार, दि. 3 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- मिस्ट्री फ्रेंड'बरोबरचा साराचा फोटो
- रॉबिन उथप्पाचा मोठा खुलासा!
- सेमिकंडक्टर राष्ट्र' बनण्याकडे पावले!
- मतदारयात्रे'त आईबद्दल अपशब्द!

### एक मराठा लाख मराठा: समाजाच्या प्रमुख सहा मागण्या अखेर मान्य

# मराठे जिंकले; सरकार नमले!

## मनोज जरांगे-पाटील यांनी उपोषण सोडले : समाजबांधवांमध्ये मोठा आनंदोत्सव

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन सुरू केलं होतं. मुंबईच्या आझाद मैदानावर त्यांचं आंदोलन सुरू होतं. आज आंदोलनाचा पाचवा दिवस होता. या आंदोलनात महाराष्ट्रातील लाखो मराठा आंदोलक सहभागी झाले होते. मनोज जरांगे पाटील यांच्या जवळपास सर्व मागण्या राज्य सरकारने मान्य केल्या आहेत. त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी आपलं उपोषण सोडलं आहे. राज्य सरकारने त्यांच्या मागण्या मान्य केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी सरकारचे आभार मानले आहेत.**



तसेच उपोषण सोडल्यानंतर मनोज जरांगे यांना अश्रू अनावर झाल्याचं पाहायला मिळालं. उपोषण सोडल्यानंतर पहिली प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे यांनी म्हटलं की, माझ्या समाजाचं कल्याण झालं असं सांगत सर्व आंदोलकांनी आता मुंबईतून पुन्हा आपआपल्या गावी जाताना शांततेत जावं असं आवाहनही त्यांनी मराठा आंदोलकांना केलं आहे. मनोज जरांगेंनी काय म्हटलं? "महाराष्ट्रात मराठ्यांचा विजय झाला आहे. आज मराठा समाजासाठी सोन्याचा दिवस आहे. माझ्या समाजाचं कल्याण झालं आहे", असं म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी सर्व आंदोलकांचे आभार मानले आहेत.

### राज्य सरकारने कोणत्या मागण्या मान्य केल्या?

हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी, आंदोलनात बळी गेलेल्या कुटुंबीयांच्या वारसांना नोकरी, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची मागणी मान्य, मराठ्यांच्या ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतीत लावणार, वंशवळ समिती गठित करणे, सगेसोयऱ्यांची छाननी करण्याचा मुद्दा, मराठा-कुणबी एक असल्याचा जीआर दोन महिन्यांत काढण्यात येणार, सातारा, औंध गॅझेटबाबत १५ दिवसांत लागू करण्याचं आश्वासन अशा मागण्या राज्य सरकारने मान्य केल्याल्याची माहिती मनोज जरांगे यांनी दिली आहे.

### आंदोलकांचा जल्लोष

मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या राज्य सरकारने मान्य केल्यानंतर मराठा आंदोलकांनी एकच जल्लोष केला आहे. यावेळी मनोज जरांगे पाटील यांच्या नावाने आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी देत परिसर दणाणून सोडला आहे. तसेच मराठा आंदोलकांच्या मागण्या मान्य झाल्याचं सांगत आंदोलन यशस्वी झाल्याच्या प्रतिक्रिया आंदोलकांनी दिल्या आहेत.

> माझ्या समाजाचं कल्याण झालं असं सांगत सर्व आंदोलकांनी आता मुंबईतून पुन्हा आपआपल्या गावी जाताना शांततेत जावं
>
> **--मनोज जरांगे-पाटील,** मराठा आंदोलन नेते

> "मला अतिशय आनंद आहे की मराठा समाजाच्या हिताचा तोडगा आज मंत्रिमंडळ उपसमितीने काढला. त्यामुळे जे उपोषण सुरू आहे, ते उपोषण आता संपलं आहे.
>
> **- देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री.

## तर प्रति दिवस १०० दंड

## तर प्रति दिवस १०० दंडाबरोबर पैसे मोजावे लागणार

# 'या' वाहनांचा कर वेळेत भरला नाही!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार भारत (बीएच) मालिकातील क्रमांक असलेल्या वाहनधारकांना दोन वर्षांनंतर वाहन कर भरणे बंधनकारक आहे. मात्र, मुदत संपुष्टात आल्यानंतरही या मालिका क्रमांकातील सर्वाधिक वाहनधारक हा कर भरण्यास टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या पार्श्वभूमीवर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) कठोर पावले उचलून मुदतीनंतर १०० रुपये दंड आणि जादा विलंब केल्यास अतिरिक्त दंड आकारण्याचा इशारा दिला.**

## जादा विलंब केल्यास अतिरिक्त दंड




केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने २०२१ मध्ये जारी केलेल्या अधिसूचनेमुळे देशभरात 'बीएच' मालिकेतील वाहनांची नोंदणी सुलभ झाली आहे. या योजनेअंतर्गत वाहन मालकांना एकाच नोंदणीद्वारे देशभरात वाहन चालवण्याची मुभा मिळते. अधिसूचनेनुसार, वाहनाचा कर दोन वर्षांसाठी एकदाच आकारला जातो. कराची मुदत संपल्यानंतरच्या सात दिवसांनंतर, म्हणजे आठव्या दिवसापासून प्रतिदिन १०० रुपये दंड लागू होतो.

पुणे आरटीओ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, "बीएच" मालिकेतील वाहनांची दोन वर्षांची कर मुदत संपल्यानंतरही अनेक मालक कर भरण्यात टाळाटाळ करत आहेत. यामुळे दंडाच्या रकमेतही मोठी वाढ झाली आहे. 'बीएच' मालिकेतील वाहनमालकांनी कराची मुदत संपण्यापूर्वीच किंवा वेळेत कर भरावा, अन्यथा मुदत संपल्यानंदर प्रतिदिवस १०० रुपये आणि दिवसांच्या विलंबानुसार अतिरिक्त दंड आकारण्यात येणार आहे.'वाहनमालकांसाठी परिवहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच, नजीकच्या आरटीओ विभागातही संपर्क साधून कर भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.बीएच' मालिकेतील वाहनांची संख्या पुणे शहरात मोठ्या प्रमाणात आहे. कोणत्याही ठिकाणी हा कर भरता येत असला, तरी या वाहनांचा कर भरला आहे किंवा नाही याची तपासणी करण्यात येणार आहे. संबंधितांनी वाहनाचा कर वेळेत भरणे अपेक्षित असून, तातडीने मुदतीच्या आत कर भरावा,

### ऑनलाईन सुविधा उपलब्ध

बीएच' मालिकेतील वाहनांची संख्या पुणे शहरात मोठ्या प्रमाणात आहे. कोणत्याही ठिकाणी हा कर भरता येत असला, तरी या वाहनांचा कर भरला आहे किंवा नाही याची तपासणी करण्यात येणार आहे. संबंधितांनी वाहनाचा कर वेळेत भरणे अपेक्षित असून, तातडीने मुदतीच्या आत कर भरावा, अन्यथा नियमानुसार कारवाई करून विलंब झाल्यास जादा दंड आकारण्यात येणार आहे.

अन्यथा नियमानुसार कारवाई करून विलंब झाल्यास जादा दंड आकारण्यात येणार आहे.केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने २०२१ मध्ये जारी केलेल्या अधिसूचनेमुळे देशभरात 'बीएच' मालिकेतील वाहनांची नोंदणी सुलभ झाली आहे.

या योजनेअंतर्गत वाहन मालकांना एकाच नोंदणीद्वारे देशभरात वाहन चालवण्याची मुभा मिळते. अधिसूचनेनुसार, वाहनाचा कर दोन वर्षांसाठी एकदाच आकारला जातो. कराची मुदत संपल्यानंतरच्या सात दिवसांनंतर, म्हणजे आठव्या दिवसापासून प्रतिदिन १०० रुपये दंड लागू होतो. पुणे आरटीओ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, "बीएच" मालिकेतील वाहनांची दोन वर्षांची कर मुदत संपल्यानंतरही अनेक मालक कर भरण्यात टाळाटाळ करत आहेत. यामुळे दंडाच्या रकमेतही मोठी वाढ झाली आहे. 'बीएच' मालिकेतील वाहनमालकांनी कराची मुदत संपण्यापूर्वीच किंवा वेळेत कर भरावा, अन्यथा मुदत संपल्यानंदर प्रतिदिवस १०० रुपये आणि दिवसांच्या विलंबानुसार अतिरिक्त दंड आकारण्यात येणार आहे.'वाहनमालकांसाठी परिवहन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच, नजीकच्या आरटीओ विभागातही संपर्क साधून कर भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

# पुणे - नाशिकचा प्रवास दोन तासांनी घटणार

## चाकण औद्योगिक कंपन्यांनाही होणार फायदा ?

**नाशिक फाटा ते राजगुरुनगर (खेड) हा ३० किलोमीटर लांबीचा पुणे-नाशिक महामार्ग उन्नत होणार आहे. त्यामुळे सध्या या मार्गादरम्यान प्रवासासाठी लागणारा दीड-दोन तासांचा कालावधी अवघ्या २० मिनिटांवर येणार आहे. त्याकरिता भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून (एनएचएआय) निविदा प्रक्रिया राबविण्यात येत असून, २५ सप्टेंबर रोजी निविदा खुल्या करण्यात येणार आहे.**



तत्पूर्वी, 'एनएचएआय'ने पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि जिल्हाधिकारी कार्यालयाला तातडीने ९० टक्क्यांपर्यंत भूसंपादन प्रक्रिया पार पाडण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकल्पासाठी सुमारे १४ हेक्टर जमीन संपादित करणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने या मार्गाचा प्रवेशमार्ग आणि निर्गमन असा ३० किलोमीटरचा परिसर 'पीएमआरडीए'च्या हद्दीत येतो. मुख्यमंत्री स्तरावर झालेल्या बैठकीत या प्रकल्पासाठी ऑक्टोबरपूर्वी भूसंपादन पूर्ण करण्याची ग्वाही देण्यात आली

### अतिरिक्त कामे सुरू

प्रस्तावित जमीन ही नाणेकरवडी, वाकी खुर्द, वाकी बुद्रुक, चिंबळी, कुरुळी, मेदनकरवाडी, चाकणचा काही भाग या गावांतील आहे. भूसंपादन प्रक्रिया जलद करण्यासाठी शक्य असेल, तेथे हस्तांतरण विकास हक्क (टीडीआर) किंवा चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) देऊन भूसंपादन करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत, असे 'पीएमआरडीए'कडून सांगण्यात आले.

होती. मात्र, ८० टक्के भूसंपादन पूर्ण होईपर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात करता येत नसल्याचे 'एनएचएआय'कडून बैठकीत सांगण्यात आले.शहरी वाहतूक कोंडी कमी करण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. या प्रकल्पात विद्यमान पुणे- हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर चाकण महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला (एमआयडीसी) जोडणाऱ्या पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्याची अपेक्षा आहे. 'पीएमआरडीए' क्षेत्रातील १५० जमीन मालकांच्या मालकीची ९.७४ हेक्टर जमीन संपादनासाठी राखीव ठेवण्यात आली आहे.

बांधकाम व्यावसायिकांची चालढकल | पिंपरी चिंचवडमध्ये पालिकेची पाणीपुरवठ्यासाठी असमर्थता

# नव्या गृह प्रकल्पांसाठी 'पाणीबाणी'!

## सदनिकाधारकांची हदबलता; पाणीपुरवठ्याचा खर्च हाऊसिंग सोसायटीच्या माथी

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार आणि मोठमोठ्या गृहप्रकल्पांची वाढती संख्या पाहता, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेवर मोठा ताण आला आहे. त्यामुळे नव्याने उभारण्यात येणाऱ्या अनेक टोलेजंग गृहनिर्माण प्रकल्पांना महापालिकेकडून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होणे अशक्य आहे. त्यामुळे बांधकाम व्यवसायिकांनी बांधकाम परवाना घेताना पाणीपुरवठ्याबाबतचे हमीपत्र बंधनकारक करण्यात आले आहे.**

बांधकाम व्यावसायिकांना त्या अटीवरच बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दिला जातो. मात्र, बांधकाम व्यावसायिक ती जबाबदारी हौसिंग सोसायटींवर टाकून मोकळे होतात. त्यामुळे खासगी पाण्याच्या टँकरचा वर्षभराचा आर्थिक खर्च सोसायटीच्या माथी पडत आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील नव्या गृहप्रकल्पांना महापालिकेकडून पिण्याचे पाणी दिले जात नाही. बांधकाम परवानगी देतानाच संबंधित बांधकाम व्यावसायिकांना त्या अटीवरच बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दिला जातो. मात्र, बांधकाम व्यावसायिक ती जबाबदारी हौसिंग सोसायटींवर टाकून मोकळे होतात. त्यामुळे खासगी पाण्याच्या टँकरचा वर्षभराचा आर्थिक खर्च सोसायटीच्या माथी पडतो तसेच पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

हौसिंग सोसायटी तयार करून दिल्यानंतर पाण्याचे तुमचे तुम्ही बघा, असे सांगून बांधकाम व्यावसायिक हात झटकून निघून जातात. मानवतेच्या दृष्टिकोनातून तसेच राजकीय दबावामुळे तेथील रहिवाशांना पिण्याचे तरी पाणी देण्यासाठी पालिकेला प्रयत्न करावा लागत आहे. उपलब्ध पाण्यातून नवीन गृहप्रकल्पांना पाणी देण्याची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे इतर भागांत कमी पाणीपुरवठा होत आहे.

> भामा आसखेड पाणी प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहराला अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे. तोपर्यंत बांधकाम व्यावसायिकांनी दिलेल्या हमीपत्रानुसार त्या-त्या हौसिंग सोसायटीतील रहिवाशांना पाणी उपलब्ध करून दिले पाहिजे. ती त्यांची जबाबदारी आहे. प्रकल्प पूर्ण होऊन १६७ एमएलडी पाणी उपलब्ध होण्यास एक ते दीड वर्ष लागणार आहेत. नव्या हौसिंग सोसायट्यांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेकडे पाण्याचे नवे स्रोत नाहीत.
> **-अजय सूर्यवंशी,** सह शहर अभियंता

### सोसायट्यांमध्ये पाणीटंचाई

पिंपरी-चिंचवड शहरात बांधकाम व्यावसायिकांकडून मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प उभारले जात आहेत. त्या गृहप्रकल्पांची उभारणी झाल्यानंतर भविष्यात तेथील नागरिकांना पाणी कुठून उपलब्ध करायचे? असा प्रश्न निर्माण होत आहे. मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प उभारले जात आहेत. एकाच ठिकाणी एक ते दोन हजार सदनिका तयार करून मोठमोठे टोलेजंग टॉवर उभे राहत आहेत. त्या नव्या गृहप्रकल्पांना महापालिकेकडून पिण्याचे पाणी दिले जात नाही. त्यामुळे त्या गृहप्रकल्प तसेच हौसिंग सोसायट्यांना पाणीटंचाईस सामोरे जावे लागत आहे.

### सोसायटीला आर्थिक ताण

महापालिकेकडे पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध नसल्याने पाणीपुरवठा विभागाकडून नव्या गृहप्रकल्पांसाठी पिण्याचे पाणी दिले जात नाही. पाण्याचा ना-हरकत दाखला (एनओसी) आणि पाणी उपलब्ध होईपर्यंत संबंधित बांधकाम व्यावसायिकांकडून सदनिकाधारकांना पाणीपुरवठा करावा म्हणून त्यांच्याकडून हमीपत्र घेण्यात येते. सन २०१९ पासून असे हमीपत्र घेण्यात येत आहेत. त्यानंतरच बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दिला जातो. शहरात अशा गृहप्रकल्पांची संख्या हजारोत आहे. त्यात लाखो सदनिका तयार झाल्या आहेत. बांधकाम व्यावसायिकांकडून गृहप्रकल्पात हौसिंग सोसायटी तयार करून सदनिकाधारकांकडे संपूर्ण प्रकल्प हस्तांतरित केला जातो. महापालिकेकडून सोसायटीस पाणी मिळत नसल्याने खासगी पाण्याच्या टैंकरकडून पाणी मागवावे लागते. त्यावर वर्षाला लाखो रुपये खर्च होतो. हा आर्थिक ताण सोसायटीला म्हणजे सदनिकाधारकांना सहन करावा लागतो.

# उपनगरांमध्ये रस्त्यांची वाट बिकट!

## खड्ड्यांमुळे नागरिकांची धावपळ; प्रशासनाकडून कानाडोळा; नागरिकांचा संताप

| पिपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज


**गणेशोत्सवासारखा सण साजरा करताना नागरिकांना खड्डे चुकवण्यासाठी धावपळ करावी लागत आहे. सातत्याने तक्रारी करूनही महापालिका प्रशासनाचा याकडे कानाडोळा होत असल्यामुळे नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. उपनगरातील भागात मुख्यत्वे खड्ड्यांची समस्या प्रकर्षाने जाणवत आहे.**



विकासनगर ते मुकाई चौक रस्त्यावरील धोकादायक खड्डे पडले आहेत. त्यातून मार्ग काढताना वाहनचालकांची दमछाक होत आहे

पिंपरी चिंचवड शहरातील किवळे, विकासनगर, बापदेवनगर, साईनगर, मामुर्डी, चिखली, चऱ्होली, डुडुळगाव, दिघी या परिसरातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. मुकाई चौक ते विकासनगर या अवघ्या आठशे मीटर अंतराच्या रस्त्यावर सुमारे शंभरपेक्षा अधिक खड्डे आहेत.गणेशोत्सवासारखा मोठा सण साजरा करताना नागरिकांना खड्डे चुकवण्यासाठी धावपळ करावी लागत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. रस्त्यावरील असंख्य खड्डे, आडवे चर आणि अर्धवट राहिलेले खोदकाम यामुळे गणेशोत्सवाच्या आनंदावर विरजणच पडले आहे. रस्त्यांची अवस्था इतकी बिकट झाली आहे की, अनेक नागरिकांनी खड्डयांपासून बचाव करताना अपघात ग्रस्त होत आहेत. नागरिकांनी सातत्याने तक्रारी करूनही महापालिकेने कानाडोळा केल्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.गणेशोत्सवात महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. अशा वेळी रस्त्यांवरील खड्डे, चिखल आणि निसरडी माती यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. साईनगर बसथांबा ते चिंतामणी चौक, मामुर्डी किवळे मार्ग, गहुंजे सेवा रस्ता आणि आदर्शनगर परिसरात रस्त्यांची अवस्था धोकादायक आहे. चिखली तसेच दिघी भागात मोठ्या प्रमाणात रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत यामुळे अपघातांची संख्या देखील वाढली आहे. चऱ्होली खडीमशीन रस्त्यावर नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. महापालिकेच्या ढिसाळ आणि बेजबाबदार कारभारामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. उन्हाळ्यात वेळ असतानाही रस्त्यांची डागडुजी झाली नाही आणि आता पावसात हे काम करणे अशक्य बनले आहे.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



### आनंद कशामुळे मिळतो ?

सृष्टी शून्यापासून निर्माण झाली. आपलीही मूळ स्थिती तीच आहे, म्हणून आपण शून्याकडे जाण्याचा प्रयत्न करावा; म्हणजेच, स्वानंदात स्वस्थ राहावे. पण ते आपल्या हातून होत नाही, कर्म करीतच राहावे असे वाटते. प्रपंचाची दगदग झाली म्हणजे आपण दूर जाऊन बसतो; पण मनाची तळमळ त्यामुळे नाहीशी झाली नाही, तर काय उपयोग ? याकरिता मनाची स्वस्थता कशाने येईल ते पाहावे. आनंद कुणाला नको आहे ? आपल्याला आनंद हवा आहे खरा, परंतु तो मिळविण्यासाठी जे करायला पाहिजे ते आपण करीत नाही. नोकरी नको आणि खायला हवे, हे कसे शक्य आहे ? खरेखर, प्रपंचाच्या या अगणित उपाधींतून सुटून जो स्वास्थ्याकडे जातो तो धन्यच होय. मनाच्या विरुद्ध गोष्टी झाल्या की लगेच आपल्या आनंदात बिघाड येतो; याकरिता, आपल्या इच्छेविरुद्ध घडले तरी माझे स्वास्थ्य बिघडणार नाही, इकडे पाहावे. याला एकच उपाय आहे, आणि तो म्हणजे माझी इच्छाच मी नाहीशी करणे. कोणतीही वस्तू मिळावी किंवा अमुक एक गोष्ट घडावी, ही बुद्धीच ठेवू नये. जोपर्यंत हाव आहे तोपर्यंत स्वास्थ्यापासून आपण दूर आहोत असे समजावे. महत्त्वाकांक्षा खुशाल धरावी, पण त्यामुळे मनाला त्रास होऊ देऊ नये. भगवंताची इच्छा तीच माझी इच्छा असे म्हणावे, आणि अभिमान सोडून कर्म करीत राहावे. प्रयत्न करून जे काही होते, ते रामाच्या इच्छेने झाले म्हणावे. कर्तेपणाचा अभिमान सोडल्यानेच स्वास्थ्य लाभते. मागे घडलेल्या चांगल्या-वाईट गोष्टी आठवत राहणे यामुळे आनंदात बिघाड येतो. तसेच उद्यांची काळजी करीत राहणे यामुळेही मनाच्या स्वास्थ्यात व्यत्यय येतो. होते-जाते हे सर्व भगवंताच्या इच्छेने होते, हे मनाने पक्के ठरविल्यावर मग विनाकारण काळजी का करावी ? दु:ख करणे अथवा न करणे हा मनाचा धर्म असल्यामुळे, ज्या माणसाने मनाला योग्य वळण दिले आहे, तो प्रत्यक्ष दुखणे भोगीत असताही आनंदात राहू शकेल. म्हातारपणी तर आनंद हे मोठे शक्तिवर्धक औषध आहे. ज्याला नामाचे प्रेम आले त्याला शरीराच्या कोणत्याही अवस्थेत आनंदाचा लाभ होतो; आणि ज्याला असा आनंदाचा लाभ झाला, त्याच्यावर रामाने कृपा केली असे खचित समजावे. भगवंतासाठी एकच दान खरे आहे, आणि ते म्हणजे आत्मदान होय. सतत भगवंताच्या नामात राहून देहाची विस्मृती होणे हा आत्मदानाचाच प्रकार आहे.

बोधवचन:- वाणीने नाम घ्यावे व मनाने स्मरण करावे, आणि या दोन्हीचा मेळ असावा.

# फडणवीसांचा “मास्टरस्ट्रोक”



**मराठा आरक्षणाचा प्रश्न गेली अनेक वर्षे महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय क्षेत्रात प्रखरतेने गाजत आहे. न्याय, समावेश व अस्मितेच्या मुद्द्यांवर आधारित असलेला हा संघर्ष अनेकदा आंदोलनाच्या स्वरूपात उफाळून आला. मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन, त्याची व्याप्ती, त्यामागील जनसमर्थन आणि शासनावर येणारा दबाव लक्षात घेतला तर ही एक गंभीर सामाजिक-राजकीय घडी होती. अशा वेळी, राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ उपसमितीने घेतलेला निर्णय आणि त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले विधान यामुळे आरक्षणाच्या मुद्द्यावर एक तात्पुरता का होईना, पण समंजस आणि कायदेशीर तोडगा निघाला आहे.**

राजकीय पटलावर देवेंद्र फडणवीस यांची ही भूमिका “मास्टरस्ट्रोक” म्हणून भाजपा नेत्यांकडून गौरवली जात आहे. प्रवीण दरेकर यांनी त्यांच्या भूमिकेचे कौतुक करत “देवाभाऊंचा मास्टरस्ट्रोक” असा उल्लेख केला, तर चंद्रशेखर बावनकुळे यांनी फडणवीसांच्या दूरदृष्टीचा उल्लेख करून त्यांच्यावर विश्वास प्रकट केला. मात्र याचवेळी, ही भूमिका केवळ एकतर्फी स्तुतीचा विषय ठरू नये. ही एक अभ्यासपूर्ण आणि समन्वयावर आधारित धोरणशक्ती होती, जिथे न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला गेला आहे, पण इतर समाजांमध्ये असंतोष निर्माण न होता तोडगा निघेल याची काळजीही घेतली गेली.

### राजकीय नेतृत्वाची कसोटी

मराठा आरक्षणाच्या मागणीत ‘सरसकट आरक्षण’ हा प्रमुख मुद्दा होता. मात्र, संविधान आणि न्यायालयीन निर्णय लक्षात घेतल्यास, ‘समूह’ नव्हे तर ‘व्यक्ती’ आधारावरच आरक्षण देता येते. फडणवीस यांनी हे स्पष्टपणे सांगून एक मोठा निर्णय घेतला. त्यांनी मान्य केलं की सरसकट आरक्षणाच्या मागणीला कायदेशीर मर्यादा आहेत, आणि मनोज जरांगे पाटील यांना हे पटवून देणं, हे त्यांचं मोठं यश ठरलं. हा केवळ राजकीय यशाचा मुद्दा नाही, तर संवाद आणि समजुतीच्या माध्यमातून संघर्ष न टोकास नेता तोडगा काढण्याची प्रशासकीय कुवत यातून दिसून येते. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने केलेली मेहनत, बैठका, चर्चेचा अभ्यास – हे सर्व फडणवीसांनी खुलेपणाने मान्य केलं. ही सहकार्यात्मक राजकारणाची पावले आहेत, ज्या काळात ‘क्रेडिट घेणं’ हे अधिक महत्त्वाचं मानलं जातं त्या काळात, सहकार्याचं कौतुक करणं ही विधायक भूमिका आहे.

### हैदराबाद गॅझेटचा आधार – कायदेशीर तोडगा

मराठवाड्यातील मराठा बांधवांची प्रमुख अडचण म्हणजे त्यांच्या कुळातील कुणब्याची ओळख सिद्ध करणारी कागदपत्रं उपलब्ध नसणं. यावर ‘हैदराबाद गॅझेट’ चा आधार घेऊन तोडगा काढण्यात आला आहे. जे मराठा लोक कुणबी असल्याचे पुरावे सादर करू शकतात, त्यांना प्रमाणपत्र देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ‘फॅमिली ट्री’ तयार करून आरक्षणाचा लाभ घेण्याची प्रक्रिया ही नवीन संकल्पना नसली तरी ती प्रभावीपणे राबविण्याची जबाबदारी आता प्रशासनावर आहे. या प्रक्रियेमुळे न्यायाची संधी वाढेल, पण भ्रष्टाचार, बनावट कागदपत्रे व राजकीय हस्तक्षेप यापासून यंत्रणा दूर राहिली पाहिजे.

### ओबीसी समाजाची चिंता – समंजस उत्तर

या निर्णयामुळे ओबीसी समाजामध्ये असलेली भीती – की मराठा समाजाला सरसकट ओबीसी आरक्षण मिळेल – तीही दूर करण्यात आली आहे. फडणवीस यांनी स्पष्ट केलं की, केवळ जे खरा दावा सिद्ध करू शकतात त्यांनाच फायदा मिळेल. हा दृष्टिकोन एकाचवेळी दोन समाजांमध्ये तणाव निर्माण होऊ न देणारा आणि कायद्यातील मर्यादा जपत, न्याय साधणारा आहे.

### राजकारण आणि श्रेयाचे राजकारण

सुषमा अंधारे यांच्यासारख्या विरोधकांनी केलेले आरोप लक्षात घेतल्यास, एक गोष्ट स्पष्ट आहे की भाजपकडून देवेंद्र फडणवीस यांचे यश एका ‘नायकत्वा’च्या प्रतिमेतून साजरे केले जात आहे. हे करताना एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचं योगदान वा भूमिका फारशा चर्चेत येत नाहीत. त्यामुळे महायुतीतील अंतर्गत राजकीय गणिते, ‘पॉवर सेंटर’ कोठे आहे, याचे संकेत यातून मिळतात. जर फडणवीस यांचं कौतुक हे केवळ मराठा आरक्षणासाठी नाही, तर त्यांच्या राजकीय पुनरुज्जीवनाच्या दृष्टीनेही केले जात असेल, तर हे भाजपसाठी आगामी निवडणुकांत मराठा समाजाचा पाठिंबा मिळवण्याची नीती मानली पाहिजे. मात्र, ही रणनीती दीर्घकालीन असेल की केवळ तात्कालिक राजकीय पोळी भाजण्यासाठी असेल, हे पाहणं महत्त्वाचं ठरेल.

### समाजासाठी काम – व्यक्तिगत आशयाची छटा

फडणवीस यांनी “माझ्यावर आरोप झाले, शिव्या मिळाल्या तरी मी समाजासाठी काम करत राहीन” असं म्हटलं आहे. ही एक प्रकारची भावनिक साद आहे. राजकारणात टीका सहन करणं, यशापयश स्वीकारणं अपेक्षितच असतं, पण त्यातून पुढे जाऊन लोकहितासाठी काम करण्याची बांधिलकी दाखवणं, ही नेतृत्वाची जबाबदारी असते. हे त्यांनी आपल्या शब्दांत अधोरेखित केलं.

### निर्णयाचे स्वागत – पण पुढे काय?

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी एक संवैधानिक आणि कायदेशीर तोडगा निघाल्याने, तात्पुरत्या स्वरूपात का होईना, शांतता प्रस्थापित झाली आहे. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी, त्यामध्ये येणाऱ्या अडचणी, प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया – हे सर्व निर्णायक ठरेल. या सगळ्या पार्श्वभूमीवर, देवेंद्र फडणवीस यांची भूमिका केवळ “मास्टरस्ट्रोक” म्हणून पाहणे ही राजकारणाची एक बाजू आहे. परंतु यामध्ये सहकार्य, संवेदनशीलता, समन्वय, कायद्याची मर्यादा आणि समाजातील विविध घटकांमध्ये समतोल राखण्याची राजकीय परिपक्वता दिसून आली आहे. तीच खरी त्यांच्या निर्णयाची ताकद आहे. राज्य सरकारने आता या निर्णयाचे अंमलबजावणी करताना पारदर्शकता आणि संवेदनशीलता राखली, तर मराठा समाजाच्या न्यायाची लढाईला वास्तवात सकारात्मक वळण मिळू शकते. मात्र, ही प्रक्रिया हाफतली की नाही, यावरच या निर्णयाचा खरा यश किंवा अपयश ठरणार आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

जरांगे यांचे उपोषण मागे

## जरांगे यांचे उपोषण पाचव्या दिवशी मागे

# न्यायालयाच्या रेट्यामुळे समेट!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मनोज जरांगे पाटील यांच्यावर न्यायालयाचा रेटा तर दुसरीकडे सरकारवरील वाढता दबाव यातून उभयतांनी समजूतदारपणा दाखविल्याने जरांगे पाटील यांच्या उपोषणाची अखेर पाचव्या दिवशी सांगता झाली. मागण्या मान्य झाल्याबद्दल जरांगे यांनी गुलाल उधळला असला तरी हैदराबाद गॅझेटियर राज्य सरकारने आधीच स्वीकारले असून प्रचलित कार्यपद्धतीचे आदेश काढण्यात आले आहेत. यातून जरांगे यांच्या हाती फारसे काही नवीन लागलेले नाही, असे एकूण चित्र आहे.**

## सरकारच्यावतीने जरांगेशी चर्चे



गेल्या शुक्रवारपासून मुंबईतील आझाद मैदानात आमरण उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर तोडगा निघत नव्हता. राज्य सरकारच्या वतीने जरांगे यांच्याशी चर्चेची एकच फेरी पार पडली होती. कोणीही मंत्री आधी उपोषणस्थळी फिरकले नव्हते. उच्च न्यायालयाने जरांगे यांचे उपोषण आणि मुंबईत झालेला गोंधळ यावरून कानउघाडणी केली होती. मोठ्या प्रमाणावर जरांगे समर्थक जमल्याने दक्षिण मुंबईची पार दशा झाली होती. उच्च न्यायालयाने सोमवारी जरांगे यांना फटकारले होते. आजच्या सुनावणीत दुपारी ३ पर्यंत मुंबईबाहेर पडा आणि आझाद मैदान मोकळे करा, असेही उच्च न्यायालयाने जरांगे यांना आज बजावले होते. शेवटी सरकारच्या वतीने जरांगे यांच्या काही मागण्या मान्य करण्यात आल्या.

त्यानंतर जरांगे यांनी उपोषण मागे घेतले. मंत्रिमंडळाच्या मराठाविषयक उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासह सदस्य शिवेंद्रराजे भोसले, उदय सामंत, माणिकराव कोकाटे, जयकुमार गोरे यांनी उपोषणस्थळी जाऊन जरांगे यांच्याशी चर्चा केली. हैद्राबाद आणि सातारा गॅझेटची अंमलबजावणी, आतापर्यंत शोधलेल्या ५८ लाख नोंदी-अभिलेख सर्व ग्रामपंचायतीच्या फलकावर प्रसिद्ध करणे, मराठा आरक्षण आंदोलनामध्ये मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना आर्थिक मदत व नोकरी देण्याबाबतची प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढणे आणि मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबतची उर्वरित प्रक्रिया सप्टेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्याच्या राज्य सरकारच्या ग्वाहीनंतर मनोज जरांगे पाटील यांनी बेमुदत उपोषण मागे घेतले.मराठा आणि कुणबी एक आहेत हा आदेश काढण्यात यावा, हैदराबाद, सातारा, औंध गॅझेटियची अंमलबजावणी, सरसकट मराठा समाजाला कुणबी दाखले द्यावेत अशा काही महत्त्वाच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय मुंबई सोडणार नाही, असा निर्धार जरांगे यांनी केला होता. ओबीसींचा विरोध लक्षात घेता आणि कायदेशीर मुद्द्यांवरही ओबीसी कोट्यातून आरक्षणाची केलेली मागणी मान्य करणे सरकारला शक्य नव्हते. त्यामुळे राज्य सरकारने त्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी मागितला आहे. तो पूर्ण होईपर्यंत राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता लागू होईल आणि सरकारला काही महिने निर्णय घेता येणार नाही. हैदराबाद व सातारा गॅझेट अमलात आणणे, या अन्य मागण्या होत्या. सातारा गॅझेटमध्ये त्रुटी असल्याचे सांगून सरकारने केवळ हैदराबाद गॅझेट स्वीकारले आहे.हैदराबाद गॅझेटसह आणखी ऐतिहासिक दस्तऐवज स्वीकारून माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांनी मराठवाड्यात सुमारे १५-२० हजार कुणबी नोंदी शोधल्या आहेत. त्याचा लाभ वंशावळीतील वारसांना होऊन मराठवाड्यात दोन-तीन लाख नागरिकांना कुणबी दाखले देण्यात आले आहेत. तर राज्यात ५८ लाख कुणबी नोंदी शोधण्यात आल्या आहेत.

### नोंदी नव्याने वाढणे शक्य नाही

जुन्या दस्तऐवजात कुणबी नोंद सापडल्यावर त्यांच्या वंशजांना सध्या पितृसत्ताक पद्धतीनेच कुणबी दाखले देण्यात येत आहेत. वंशजांच्या पुराव्यांची खातरजमा सध्याही गावपातळीवर होत असून आता केवळ ग्रामसेवकासह तिघांची कागदोपत्री समिती नेमण्यात आली आहे. हैदराबाद गॅझेट स्वीकारण्याच्या शासननिर्णयामुळे आता कोणत्याही कुणबी नोंदी नव्याने वाढणे शक्य नाही.

# तामिळनाडूप्रमाणे आरक्षण का दिले नाही?

## तामिळनाडूच्या आरक्षणाप्रमाणे 69 टक्के आरक्षण का दिले नाही

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**तामिळनाडूचे दिलेले आरक्षण हे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय होण्याअगोदर दिलेले आहे. मराठा आरक्षण हा मुद्दा अचानक निर्माण झालेला नाही. ज्यावेळी शरद पवार हे सत्तेत होते, त्यावेळी त्यांनी तामिळनाडूच्या आरक्षणाप्रमाणे ६९ टक्के आरक्षण का दिले नाही. मराठा आरक्षण त्यावेळेस गांभीर्याने का घेतले नाही.**



जरांगे यांना मराठा समाज म्हणून ताकद मिळाली आहे. पूर्वीच्या राज्यकर्त्यांनी दुर्लक्ष केल्यामुळेच आज ही परिस्थिती निर्माण झाल्याचा टोला सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी खा. शरद पवार यांना माध्यमांशी बोलताना लगावला. दरम्यान सुप्रिया सुळेंनी आंदोलनाला पाठिंबा दर्शवला यावर शिवेंद्रराजे म्हणाले, मराठा समाजाला आम्ही तुमच्याबरोबर आहे. ही दाखवायची ही संधी त्यांनी साधली आहे. आता, जाताय, बोलताय मग त्यावेळी का आरक्षण दिले नाही असा प्रश्नही त्यांनी विचारला.शिवेंद्रसिंहराजे म्हणाले, की विरोधकांनी सत्तेत असताना हा प्रश्न सोडवण्यासाठी काहीच केले नाही. देवेंद्र फडणवीस पूर्वी मुख्यमंत्री असताना जे आरक्षण दिले होते. ते विरोधकांचे सरकार असताना टिकले नाही. विरोधकांनी यापूर्वी प्रयत्न केलेच नाहीत. सकल मराठा समाजाचे मोर्चे निघाले. सातारा जिल्ह्यातून मीही मोर्चात होतो. सुप्रिया सुळेंनी आंदोलनाला पाठिंबा दर्शवला यावर शिवेंद्रराजे म्हणाले, मराठा समाजाला आम्ही तुमच्याबरोबर आहे. ही दाखवायची ही संधी त्यांनी साधली आहे. आता, जाताय, बोलताय मग त्यावेळी का आरक्षण दिले नाही.

### विरोधक निशाणा

मराठा आरक्षण देणारे देवेंद्र फडणवीस हेच आहेत. त्यामुळे त्यांना लक्ष्य केले जात आहे. उपसमितीच्या बैठकीत बरेचशे निर्णय झाले आहेत. जरांगे यांच्याबाबत झालेल्या चर्चेत काही मुद्दे ठेवले आहेत. त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून विरोधक निशाणा साधत आहेत. त्यांच्या माध्यमातून आपल्याला काही साधता येतंय का, हा प्रयत्न सुरू आहे.

मोदी यांना विश्वास

## ‘सेमिकॉन इंडिया’ परिषदेत पंतप्रधान मोदी यांना विश्वास

# सेमिकंडक्टर राष्ट्र’ बनण्याकडे पावले!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सेमिकंडक्टर उद्योग क्षेत्राची उलाढाल येत्या काही वर्षांत एक ट्रिलियन डॉलरहून अधिक होईल आणि यात भारताचा महत्वाचा वाटा असेल, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी येथे केले. भारतात बनलेली एक छोटीशी चिप नवीन तंत्रज्ञानातील बदलांना दिशा देणारी ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करताना ‘सेमिकंडक्टर राष्ट्र’ बनण्याकडे भारताची वेगाने वाटचाल सुरू आहे, असे ते म्हणाले.**

## भारताची वेगाने वाटचाल सुरू



‘सेमिकॉन इंडिया’ परिषदेचे उद्घाटन पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते मंगळवारी नवी दिल्लीतील यशोभूमी प्रदर्शन केंद्रात पार पडले. यावेळी केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, केंद्रीय वाणिज्य व उद्योग राज्यमंत्री जितिन प्रसाद यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.‘खनिज तेल हे काळे सोने आणि सेमिकंडक्टर चिप डिजिटल डायमंड असल्याचे मानले जाते’ असे सांगत मोदी पुढे म्हणाले, ‘तेलाने मागच्या शतकाला आकार दिला आणि आता ती शक्ती एका छोट्याशा चिपमध्ये एकवटली आहे.’ आज ६०० अब्ज डॉलर इतके मूल्य असलेले सेमिकंडक्टर उद्योगक्षेत्र येत्या काही वर्षांत एक ट्रिलियन डॉलरच्या पुढे जाईल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.भारताने २०२१मध्ये सेमिकंडक्टर कार्यक्रम सुरू केला आणि २०२३मध्ये पहिल्या सेमिकंडक्टर प्रकल्पाला मंजुरी दिली. त्यानंतर गेल्या दोन वर्षांत भारतातील दहा प्रकल्पांमध्ये दीड लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होत आहे. मायक्रॉन आणि टाटा या कंपन्यांनी प्रायोगिक तत्त्वावरील चिपची निर्मिती आधीच केली आहे आणि याच वर्षी भारतातील पहिली व्यावसायिक चिप दाखल होईल, अशा शब्दांत पंतप्रधानांनी भारताच्या सेमिकंडक्टर प्रगतीचे वर्णन केले. ‘सेमिकंडक्टर क्षेत्रात वेग अतिशय महत्त्वाचा आहे. म्हणूनच केंद्र सरकारने सेमिकंडक्टर निर्मिती क्षेत्रासाठी एकल खिडकी योजना आणली असून त्याद्वारे झटपट मंजुऱ्या दिल्या जात आहेत. देशात ‘प्लग अॅण्ड प्ले’ तत्त्वावर सेमिकंडक्टर पार्क उभारण्यात येत आहेत. त्या ठिकाणी जमीन, वीज, पायाभूत सुविधा, बंदरे, विमानतळ, कुशल मनुष्यबळ पुरवण्यात येत असून उद्योजक आणि गुंतवणूकदारांसाठी आकर्षक सवलतीही दिल्या जात आहेत. त्यामुळे भारतात या उद्योगाची भरभराट निश्चित असून ‘सेमिकंडक्टर राष्ट्र’ बनण्याकडे भारताची वाटचाल सुरू आहे, असे मोदी म्हणाले.

## दुर्लभ खनिजांसाठीही प्रयत्नशील

चिपचे नाव असून ती इस्रोच्या सेमिकंडक्टर प्रयोगशाळेत तयार करण्यात आली आहे. या चिपचा वापर आरोग्य, वाहतूक, दूरसंचार, संरक्षण अशा विविध क्षेत्रांतील यंत्रांमध्ये करता येऊ शकतो.सेमिकंडक्टर उद्योग क्षेत्राची उलाढाल येत्या काही वर्षांत एक ट्रिलियन डॉलरहून अधिक होईल आणि यात भारताचा महत्त्वाचा वाटा असेलअसे प्रतिपादन नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी येथे केले.

सेमिकंडक्टरसाठी आवश्यक ‘डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर’चा पाया दुर्लभ खनिजांवर आधारित आहे. ती या क्षेत्रासाठीची सर्वात आव्हानात्मक बाब असून भारत त्यावरही काम करत आहे. त्यासाठी राष्ट्रीय क्रिटिकल मिनरल मिशनची स्थापना करण्यात आली आहे, असे मोदी म्हणाले. आपल्या देशाला लागणारी खनिजे देशातच मिळावीत, यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.सेमिकंडक्टर क्षेत्रातील २५ उत्पादने देशांतर्गत निर्मित व्हावीत, यासाठी केंद्र सरकारने ‘रचना आधारित प्रोत्साहन’ योजना लागू केली असल्याची माहिती केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या कार्यक्रमादरम्यान दिली. आजघडीला पोलादाचा वापर जसा वेगवेगळ्या क्षेत्रांतील उत्पादनांच्या निर्मितीत होतो, तसेच महत्त्व सेमिकंडक्टरला प्राप्त असून वाहने, फ्रीज, स्कूटर, मोबाइल फोन यांच्यासारख्या असंख्य उत्पादनांमध्ये सेमिकंडक्टरचा वापर वाढावा आणि त्यांची निर्मिती भारतात व्हावी, यासाठी ही योजना आणल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या कार्यक्रमात भारतात बनलेली पहिलीवहिली चिप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सादर केली.

# मतदारयात्रे’त आईबद्दल अपशब्द!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा काँग्रेस, राजदवर आरोप

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारमध्ये काँग्रेसने नुकत्याच संपवलेल्या ‘मतदार अधिकार यात्रे’दरम्यान माझ्या आईबाबत अपशब्द वापरण्यात आल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. या प्रकाराबाबत मी राजद-काँग्रेसला माफ करू शकतो, पण बिहारचे लोक माझ्या आईचा अपमान केल्याबद्दल त्यांना माफ करणार नाहीत, असे प्रतिपादन पंतप्रधानांनी केले.**



## विरोधी पक्षांवर टीका केली

बिहारमधील बचत गटांशी संबंधित महिलांसाठी एका नवीन सहकारी संस्थेचे दृक्-दृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन करताना पंतप्रधान दिल्लीत एका सभेला संबोधित करत होते.दरभंगा येथे अलीकडेच झालेल्या यात्रेदरम्यान एका व्यक्तीने मंचावर येऊन पंतप्रधानांबाबत अपशब्द काढल्याने त्यावर पहिल्यांदाच मोदींनी प्रतिक्रिया देत विरोधी पक्षांवर टीका केली.

बिहारमधील बचत गटांशी संबंधित महिलांसाठी एका नवीन सहकारी संस्थेचे दृक्-दृश्य प्रणालीद्वारे उद्घाटन करताना पंतप्रधान दिल्लीत एका सभेला संबोधित करत होते. दरभंगा येथे अलीकडेच झालेल्या यात्रेदरम्यान एका व्यक्तीने मंचावर येऊन पंतप्रधानांबाबत अपशब्द काढल्याने त्यावर पहिल्यांदाच मोदींनी प्रतिक्रिया देत विरोधी पक्षांवर टीका केली. “भारतमातेचा अपमान करणाऱ्यांना माझ्या आईबाबत अपशब्द वापरणे गैर वाटले नसेल. मात्र त्यांना शिक्षा झाली पाहिजे. माझ्या दिवंगत आईचा राजकारणाशी काहीही संबंध नव्हता. ही शिवीगाळ केवळ माझ्या आईचाच नव्हे, तर देशातील माता-भगिनींचा अपमान करणारी आहे. बिहार तर माँ जानकीची भूमी आहे. तिने नेहमीच महिलांना आदर दिला आहे. राज्यातील जनता कधीही राजद व काँग्रेसला माफ करणार नाही,” असे मोदी म्हणाले. बिहारमध्ये काँग्रेसने नुकत्याच संपवलेल्या ‘मतदार अधिकार यात्रे’दरम्यान माझ्या आईबाबत अपशब्द वापरण्यात आल्याचा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. या प्रकाराबाबत मी राजद-काँग्रेसला माफ करू शकतो, पण बिहारचे लोक माझ्या आईचा अपमान केल्याबद्दल त्यांना माफ करणार नाही.

# ॥ कृष्णाकाठचा ढोल्या गणपती ॥

## दक्षिण काशी वाईतील अद्वितीय गणेशमूर्ती भाविकांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू

विजयकुमार हरिश्चंद्रे : महाईन्यूज

वाई, जि. सातारा : संपूर्ण देशात गणेशोत्सवाची धामधूम सुरू असताना, सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या दक्षिण काशी वाई नगरीतील कृष्णाकाठचा ढोल्या गणपती म्हणजेच महागणपती हे भक्तांचे श्रद्धास्थान पुन्हा एकदा प्रकाशझोतात आले आहे. शेकडो वर्षांपासून कृष्णेच्या काठावर विराजमान असलेली ही भव्य मूर्ती आजही नवसाला पावणारा देव मानली जाते. गणेश घाटावरील हे भव्य मंदिर आणि त्यातील काळ्या पाषाणात कोरलेली बैठी महागणेशमूर्ती तिच्या अगडबंब रूपामुळे 'ढोल्या गणपती' या नावाने परिचित आहे. पुण्यापासून अवघ्या ७० किमी अंतरावर आणि साताऱ्यापासून सुमारे ५५ किमी अंतरावर असलेल्या वाई शहरातील हे मंदिर १७६२ मध्ये सरदार रास्ते यांच्याद्वारे उभारण्यात आले असून, मूर्ती केवळ एका दगडातून साकारण्यात आली आहे. स्थापनेचा इतिहास शके १६९१, वैशाख शुद्ध त्रयोदशीचा मानला जातो. या परिसरातील गणेश घाट, नदीकाठची मंदिरे, आणि सतत वाहणारी कृष्णामाई यामुळे संपूर्ण परिसर एक अध्यात्मिक ऊर्जा निर्माण करतो. प्राचीन स्थापत्यशैली आणि निसर्गसंपन्नता यांचा संगम असलेल्या या मंदिरात उन्हाळ्यातही आल्हाददायक वातावरण अनुभवायला मिळते. ग्रामदैवत असलेल्या महागणपतीच्या दर्शनासाठी देशभरातून भाविक गर्दी करत असून, गणेशोत्सवाच्या काळात येथे विशेष गर्दी उसळते. "नवसाला पावणारा गणपती" अशी इथल्या भक्तांची दृढ श्रद्धा असून, अनेक भाविकांनी अनुभवलेल्या नवसपूर्तीच्या कथा स्थानिकांमध्ये प्रसिद्ध आहेत. सह्याद्रीच्या कुशीत, इतिहास, श्रद्धा, वास्तुकला आणि निसर्ग यांचं अनोखं रूप असलेलं हे गणपती मंदिर म्हणजेच कृष्णाकाठचा ढोल्या गणपती – महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि आध्यात्मिक वैभवाचं एक देखणं प्रतीक ठरलं आहे.







**महत्त्वाच्या बाबी :**

स्थापना : शके १६९१, वैशाख शुद्ध १३

मूर्ती : काळ्या पाषाणातील एकदगडी, भव्य बैठक

मंदिर बांधणी : सरदार रास्ते, इ.स. १७६२

ठिकाण : वाई, जिल्हा सातारा (पुणे – ७० किमी, सातारा – ५५ किमी)

विशेष श्रद्धा : नवसाला पावणारा गणपती



## फोटो व्हायरल

## नेमका आहे तरी कोण? काय आहे फोटोमागचं सत्य?

# मिस्ट्री फ्रेंड'बरोबरचा साराचा फोटो व्हायरल

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरची लेक सारा तेंडुलकर नेहमीच चर्चेत असते. सारा सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असून फोटो सातत्याने शेअर करत असते. दरम्यान सारा तेंडुलकरचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या फोटोंमध्ये ती एका मुलासह दिसत आहे. त्या दोघांचे गोवा, लंडनमधील काही फोटो आहेत. तर सेल्फीदेखील आहेत. पण हा मुलगा नेमका कोण आहे, जाणून घेऊया.**

### सचिन तेंडुलकरने देखील शेअर केले फोटो



अर्जुन तेंडुलकरच्या साखरपुड्याच्या बातम्यांमुळे तेंडुलकर कुटुंबीय चर्चेत आहे. अर्जुनचा रवी घई यांची नात सानिया चंडोक हिच्याबरोबर साखरपुडा झाल्याची चर्चा होती. पण याबाबत कोणीच अधिकृत माहिती दोन्ही कुटुंबांनी दिलेली नाही. यानंतर सारा तेंडुलकरने पिलाट्स अकादमी सुरू केली आहे. साराच्या या नव्या अकादमीच्या उद्घाटनाचे फोटोदेखील स्वत: सारा आणि मग सचिन तेंडुलकरने देखील शेअर केले होते. यानंतर गेल्या दोन दिवसांपासून साराचे एका मुलाबरोबर फोटो व्हायरल होत आहेत.सारा तेंडुलकरबरोबर या फोटोमध्ये असलेल्या मुलाचं नाव सिद्धार्थ केरकर आहे. सिद्धार्थ केरकर हा बिझनेसमॅन असल्याचं देखील म्हटलं जात आहे. याचबरोबर त्याच्या इन्स्टाग्राम बायोमध्ये तो चित्रकार असल्याचं दिलं आहे. तो आपल्या पेंटिंग्ससह त्याचे वेगवेगळे लुक्सदेखील शेअर करत असतो. सिद्धार्थ आणि सारा तेंडुलकरचे हे फोटो फार जुने आहेत आणि ते पुन्हा एकदा व्हायरल होत आहेत. या फोटोंमध्ये दोघेही एकमेकांचे जवळचे मित्र असल्याचं दिसत आहे आणि त्यामुळेच चाहत्यांनी साराचा सिद्धार्थ हा बॉयफ्रेंड असल्याचा उल्लेख केला आहे. पण या दोघांमध्ये नेमकं काय नात आहे, याबाबत कोणतीच माहिती समोर आलेली नाही.सारा आणि सिद्धार्थचे हे व्हायरल झालेले फोटो २०२१-२०२२ मधील आहेत. लंडन आणि गोव्यामध्ये देखील सिद्धार्थ-सारा त्यांच्या मित्रपरिवारासह फिरताना दिसले होते. तर सिद्धार्थ केरकरचा साराचे आईबाबा म्हणजेच सचिन तेंडुलकर आणि अंजली तेंडुलकर यांच्याबरोबरचा एक फोटोदेखील सोशल मीडियावर शेअर केलेला आहे. त्यामुळे सिद्धार्थ साराच्या संपूर्ण कुटुंबाला ओळखतो, हे यावरून म्हटलं जात आहे. तर सिद्धार्थ सारासह आयपीएलमधील मुंबई इंडियन्सचे सामने पाहतानादेखील स्टेडियममध्ये दिसला आहे.सारा तेंडुलकरचं नाव भारताचा कसोटी कर्णधार शुबमन गिलबरोबरही जोडलं गेलं होतं. भारताच्या इंग्लंड दौऱ्यादरम्यान युवराज सिंगच्या चॅरिटी डिनरला देखील दोघं जण एकत्र दिसले होते. शुबमन गिलने एका मुलाखतीत तो कोणालाही डेट करत नसल्याचं म्हटलं, पण तरीही सारा आणि गिल यांच्याबाबतची चर्चा मात्र थांबलेली नाही.अर्जुन तेंडुलकरच्या साखरपुड्याच्या बातम्यांमुळे तेंडुलकर कुटुंबीय चर्चेत आहे.अर्जुनचा रवी घई यांची नात सानिया चंडोक हिच्याबरोबर साखरपुडा झाल्याची चर्चा होती. पण याबाबत कोणीच अधिकृत माहिती दोन्ही कुटुंबांनी दिलेली नाही. यानंतर सारा तेंडुलकरने पिलाट्स अकादमी सुरू केली आहे. साराच्या या नव्या अकादमीच्या उद्घाटनाचे फोटोदेखील स्वत: सारा आणि मग सचिन तेंडुलकरने देखील शेअर केले होते. यानंतर गेल्या दोन दिवसांपासून साराचे एका मुलाबरोबर फोटो व्हायरल होत आहेत.सारा तेंडुलकरबरोबर या फोटोमध्ये असलेल्या मुलाचं नाव सिद्धार्थ केरकर आहे. सिद्धार्थ केरकर हा बिझनेसमॅन असल्याचं देखील म्हटलं जात आहे. याचबरोबर त्याच्या इन्स्टाग्राम बायोमध्ये तो चित्रकार असल्याचं दिलं आहे. तो आपल्या पेंटिंग्ससह त्याचे वेगवेगळे लुक्सदेखील शेअर करत असतो.सिद्धार्थ आणि सारा तेंडुलकरचे हे फोटो फार जुने आहेत आणि ते पुन्हा एकदा व्हायरल होत आहेत. या फोटोंमध्ये दोघेही एकमेकांचे जवळचे मित्र असल्याचं दिसत आहे आणि त्यामुळेच चाहत्यांनी साराचा सिद्धार्थ हा बॉयफ्रेंड असल्याचा उल्लेख केला आहे.

### सोशल मीडियावर शेअर केला

याबाबत कोणतीच माहिती समोर आलेली नाही.सारा आणि सिद्धार्थचे हे व्हायरल झालेले फोटो २०२१-२०२२ मधील आहेत. लंडन आणि गोव्यामध्ये देखील सिद्धार्थ-सारा त्यांच्या मित्रपरिवारासह फिरताना दिसले होते. तर सिद्धार्थ केरकरचा साराचे आईबाबा म्हणजेच सचिन तेंडुलकर आणि अंजली तेंडुलकर यांच्याबरोबरचा एक फोटोदेखील सोशल मीडियावर शेअर केलेला आहे.

# रॉबिन उथप्पाचा मोठा खुलासा!

## या' एका चुकीमुळे विराट कोहलीशी असलेले संबंध बिघडले

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाला २०१९ वनडे वर्ल्डकप स्पर्धेतील सेमीफायनलच्या सामन्यात न्यूझीलंडकडून पराभवाचा सामना करावा लागला होता. या स्पर्धेत विराट कोहली भारतीय संघाचा कर्णधार होता. या स्पर्धेत भारतीय संघाने घेतलेला एक निर्णय तुफान चर्चेत राहिला होता, तो म्हणजे अंबाती रायुडूला बाहेर ठेवून विजय शंकरला संघात स्थान देण्याचा निर्णय.**



त्यावेळी अंबाती रायुडू दमदार फॉर्ममध्ये असूनही थ्री डी प्लेअर म्हणून विजय शंकरचा संघात समावेश करण्यात आला होता. या निर्णयावरून विराट कोहलीवर जोरदार टीका करण्यात आली होती.एका पॉडकास्टमध्ये बोलताना भारताचा माजी खेळाडू रॉबिन उथप्पाने विराटने घेतलेल्या निर्णयावर जोरदार टीका केली होती. त्यामुळे विराटशी असलेले चांगले संबंध बिघडल्याचा खुलासा रॉबिन उथप्पाने एका मुलाखतीत केला आहे.

उथप्पाने रायुडू आणि युवराजला संघात स्थान न दिल्यामुळे देखील नाराजी व्यक्त केली होती. भारतीय संघात चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी अंबाती रायुडूला प्रबळ दावेदार मानलं जात होतं. मात्र त्याच्या नावाची चर्चा असतानाही विजय शंकरच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं होतं. तर युवराज सिंगला देखील दुर्लक्ष करण्यात आलं होतं. त्यामुळे त्याने २०१९ मध्ये फेअरवेल सामना न खेळताच निवृत्तीची घोषणा केली होती. अलीकडेच उथप्पाने याबाबत मोठा खुलासा केला आहे. आपल्या यूट्यूब चॅनेलवर बोलताना त्याने स्पष्ट केलं आहे की, त्याला विराट कोहलीवर टीका करायची नव्हती. त्यावेळी त्याने मुलाखतीत बोलताना फक्त त्या प्रश्नाचं उत्तर दिलं.

### दोघेही खूप चांगले मित्र आहेत

त्यामुळे पुढे जाऊन विराटसोबत असलेले संबंध बिघडतील याचा त्याने विचार केला नव्हता. त्याने विराटबद्दल राष्ट्रीय टेलिव्हिजनवर कुठलंही वक्तव्य करताना आधी विराटसोबत चर्चा करायला हवी होती. पण त्याने तसं काहीच न करता, मुलाखत दिली हा त्याच्यासाठी सर्वात मोठा धडा होता,असं त्याने सांगितलं.विराट कोहली आणि रॉबिन उथप्पा दोघेही खूप चांगले मित्र आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। बुधवार।
। दि. 3 सप्टेंबर 2025।

## शैक्षणिक संस्था, विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान शिक्षणावर भर दिला पाहिजे

# औद्योगिक क्षेत्रात ऑटोमेशन, डेटा संकलन महत्वाचे - रंगा गुंटी

### शिक्षण विश्व: पीसीसीओई येथे 'आयसीसीयुबीईए-25', 'आयमेस - 25' आंतरराष्ट्रीय परिषदेचा समारोप

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विकसित तंत्रज्ञानामुळे औद्योगिक जगतात ऑटोमेशन डेटा संकलन, कृत्रिम बुद्धिमत्तेची उपयुक्तता वाढली आहे. उद्योगांची गरज ओळखून शैक्षणिक संस्था, विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान शिक्षणावर भर दिला पाहिजे, असे प्रतिपादन टाटा मोटर्सच्या क्षमतावर्धन विभागाचे प्रमुख रंगा श्रीनिवास गुंटी यांनी केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) येथे आयोजित केलेल्या नवव्या 'आयसीसीयुबीईए-२५' आणि चौथ्या 'आयमेस २५' आतंरराष्ट्रीय परिषदेचा समारोप नुकताच झाला. यावेळी पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, संयोजक डॉ. जयश्री कट्टी, डॉ. नरेंद्र देवरे आदी उपस्थित होते.

पहिल्या दिवशीच्या सत्रात डॉ. तपन गांधी यांनी 'संवेदनशील एआय, नवोपक्रमासाठी नैसर्गिक स्वायत्त प्रणाली' या विषयावर तर दुसऱ्या सत्रात शिरीष कुलकर्णी यांनी 'एआय - चलित जगासाठी डेटाचा वापर करण्याचे नमुने' या विषयावर मार्गदर्शन केले. आयआयटी इंदोरचे डॉ. शैलेश कुंडलवाल यांनी 'प्रगत अभियांत्रिकी साहित्याच्या उपचारात मल्टीस्केल मॉडेलिंगची भूमिका आणि महत्त्व' या विषयावर तर रिअर ॲडमिरल आशिष कुलकर्णी यांनी 'जहाज बांधणी कार्यक्रमात शाश्वतता' ह्या विषयावर मार्गदर्शन केले.

परिषदेचे उद्घाटन सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स पॅकेजिंग नवनिर्मितीचे जनक प्रा. राव तुम्माला, आयईईईचे डॉ. अमर बुचडे यांच्या हस्ते करण्यात आले. या परिषदेसाठी विविध देशांमधून १२४० प्रवेशिका आल्या. त्यामधून २१४ शोध निबंधांचे सादरीकरण केले, असे डॉ. जयश्री कट्टी यांनी सांगितले. 'आयमेस' साठी २६० प्रवेशिकां मधून १२० शोध निबंध सादर करण्यात आले, असे डॉ. नरेंद्र देवरे यांनी सांगितले.

संशोधक सुमित कुंभार म्हणाले, परिषदेत नवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळाली. तसेच तज्ज्ञांशी संवाद साधत शंकांचे निरसन करता आले.

डॉ. स्वाती जगताप, डॉ. शैलेंद्र बन्ने यांनी परिषदेचा आढावा घेतला. विशेष उपक्रम म्हणून स्वीकारलेल्या शोध निबंधांचे प्रतीक म्हणून ३३४ रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी पुढील परिषदेचे संयोजक म्हणून डॉ. सोनाली पाटील (आयसीसीयुबीईए - २०२६) आणि डॉ. उमेश पोतदार (आयमेस - २०२६) यांची नियुक्ती करण्यात आल्याचे जाहीर केले. डॉ. नरेंद्र देवरे यांनी आभार मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

## सायबर सुरक्षेसाठी जनजागृती अन् विद्यार्थ्यांना मार्गदर्शन !

### शिक्षण विश्व : क्विक हील फाउंडेशन व एमआयटी एसीएससीच्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

। आळंदी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण व्हावी यासाठी क्विक हील फाउंडेशन आणि एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी (डी) यांच्या संयुक्त विद्यमाने एक विशेष सायबर जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. अर्न अँड लर्न योजनेअंतर्गत आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम तनिष ऑर्किड सोसायटी, फेज १ आणि फेज २ येथे पार पडला.**



या उपक्रमाचा प्रमुख उद्देश नागरिकांना सायबर गुन्ह्यांपासून सतर्क करणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. अमित ताले यांनी महाविद्यालयाची माहिती आणि उपक्रमामागील उद्दिष्ट स्पष्ट करून केली. त्यानंतर सायबर वॉरिअर क्लबच्या सदस्यांनी उपस्थित नागरिकांना सायबर सुरक्षेची शपथ दिली.

उपक्रमातील मुख्य आकर्षण नादब्रह्म सांस्कृतिक गटाने सादर केलेले प्रभावी पथनाट्य ठरले. “सायबर गुन्हे टाळा – प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय” हा संदेश केंद्रस्थानी ठेवून या नाट्यप्रयोगाद्वारे नागरिकांना संशयास्पद दुवे उघडू नयेत, अनोळखी व्यक्तींना ओटीपी किंवा बँक खात्याची माहिती देऊ नये, तसेच फिशिंग कॉल्स व मेसेजेसपासून सावध राहावे असे प्रभावी संदेश देण्यात आले.

सायबर गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून सामान्य नागरिक सहज फसवले जात आहेत. अशावेळी सायबर सुरक्षेची माहिती असणे अत्यंत आवश्यक बनले आहे. याच पार्श्वभूमीवर या उपक्रमात नागरिकांना १९०३ या राष्ट्रीय सायबर क्राईम हेल्पलाईन क्रमांकाची माहिती देण्यात आली आणि सायबर फसवणूक झाल्यास तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमामुळे सोसायटीतील नागरिकांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण झाली असून, समाजात सायबर सुरक्षेच्या अनुषंगाने सकारात्मक वातावरण तयार झाले आहे. अशा प्रकारच्या उपक्रमांची नियमित गरज असल्याचे मत अनेक नागरिकांनी व्यक्त केले.

## जेजुरीत आकर्षक गौरी सजावट




पुणे: जेजुरी रेल्वे स्थानकावर आकर्षक गौरी सजावट करताना अनुसया देवलं बारभाई आणि पूजा मोरे. या सजावटीतून वंदे भारत एक्सप्रेस आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांना जेजुरी येथे थांबा मिळावा तसेच मार्तंड एक्सप्रेसचे नामकरण करण्याची मागणी करण्यात आली आहे. (छायाचित्र: विजयकुमार)

# "नोकरी मागण्यापेक्षा नोकरी देणारे व्हा"!

**। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज**

### कासारवाडी महिलांच्या आयटीआयमध्ये उद्योजकता विकास परिचय प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या (आयटीआय) औद्योगिक प्रशिक्षण संस्था (महिला) कासारवाडी येथे दि.३० ऑगस्ट २०२५ रोजी आयडियल इंटरनॅशनल इन्स्टिटयुट ऑफ एज्युकेशन या संस्थेमार्फत उद्योजकता विकास परिचय प्रशिक्षण कार्यक्रम २०२५ अन्वये "नोकरी मागण्यापेक्षा नोकरी देणारे व्हा" हा महिला प्रशिक्षणार्थीकरिता कार्यक्रम राबविण्यात आलेला होता. या कार्यक्रमास श्री.गोविंद पानसरे, श्री. टंकसार, श्री. फुलारे, श्री. जगदाळे, श्री. सपकाळ सर याचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

यामध्ये प्रशिक्षणार्थीनींना सरकारी योजना, स्वयंरोजगार, विवध प्रकारचे व्यवसायाविषयक मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास संस्थेचे प्राचार्य श्री. ज्योत सोनवणे, श्रीम. कुमावणी मनसरा निदेशक, श्री. सिध्दार्थ कांबळे, निदेशक, श्रीम. हेमाली कोंडे निदेशक, श्रीम. वंदना चिंचवडे निदेशक, श्रीम. सोनाली निलवर्ण निदेशक यांची उपस्थितीत होती. सदर प्रशिक्षण आम्हांला स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी खूप मोलाचे वाटते, अशा भावना प्रशिक्षणार्थीनींनी व्यक्त केल्या.

# मुंबई-बंगळुरु महामार्गाच्या सेवा रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवा; खासदार श्रीरंग बारणे यांचे निर्देश



**। पिंपरी चिंचवड ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरील देहूरोड येथील सेंट्रल चौक आणि मुंबई-बंगळुरू महामार्गावरील (देहूरोड-कात्रज) बाह्यवळण मार्गावरील किवळे समीर लॉन्स, ताथवडे, पुनावळे चौक, वाकड, भूमकर वस्ती या रस्त्याची मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी मंगळवारी अधिकाऱ्यांसह पाहणी केली. सेवा रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजविण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. किवळे ते बालेवाडी स्टेडियमपर्यंत 8.3 किलोमीटर अंतरावर 'एलिव्हेटेड कॉरिडॉर'ची (उन्नत मार्ग) निर्मिती करण्यात येणार आहे. या साडेपाच हजार कोटी रुपयांच्या प्रस्तावाला महिन्याभरात मान्यता मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतून मुंबई-बंगळुरू महामार्ग जातो. वाकड भूमकर चौक, ताथवडे व पुनावळेतील अंडरपास, किवळेतील मुकाई चौक आणि देहूरोड येथील सेंट्रल चौकात अनेकदा वाहतूक कोंडी होते. ती सोडविण्यासाठी एलिव्हेटेड कॉरिडॉर' मार्ग उभारण्यात येणार आहे. खासदार बारणे यांनी देहूरोड बाय पास जंक्शन ते वाकड चौक सेवा रस्त्याची पाहणी केली. महापालिका आयुक्त शेखर सिंह,

### महापालिका, एनएचआयच्या अधिकाऱ्यांसह रस्त्याची पाहणी

### साडेपाच हजार कोटी रुपयांच्या 'एलिव्हेटेड कॉरिडॉर'ला लवकरच केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (एनएचआय) प्रकल्प संचालक संजय कदम, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम, सहशहर अभियंता देवण्णा गट्टूवार, कार्यकारी अभियंता सुनिल पवार, कार्यकारी अभियंता सुनिल शिंदे, सहायक संचालक नगररचना संदेश खडतरे, शिवसेनेचे पिंपरी-चिंचवड शहर प्रमुख निलेश तरस, युवासेना मावळ लोकसभा प्रमुख राजेंद्र तरस उपस्थित होते.

खासदार बारणे यांनी देहूरोड वाय जंक्शन ते किवळे समीर लॉन्स, ताथवडे, पूनावळे चौक, वाकड, भूमकर चौकात जागेवर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. याबाबत नागरिकांच्या तक्रारीं आहेत. ते खड्डे तातडीने बुजविण्याचे निर्देश खासदार बारणे यांनी दिले. खासदार बारणे म्हणाले, महामार्गाच्या दोन्ही बाजूला एनएचआय 12 मीटर सेवा रस्ता विकसित करणार आहे. जागेचे भूसंपादन झाले आहे.




College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046